मुलांसाठी बाइबल

प्रस्तुत



# मंडळी समस्यांना तोंड देते

लेखक: Edward Hughes

रेखाचित्रकार: Janie Forest

रूपान्तरकार: Ruth Klassen

अनुवादक: Rev. Shilas Gavit

निर्माता: Bible for Children
www.M1914.org

©2014 Bible for Children, Inc.
परवाना (लाइसेंस): तुम्ही जोपर्यंत ही गोष्ट विकत नाहीत,
तोपर्यंत तुम्ही ती कॉपी किंवा मुद्रित करू शकता.

देवाचा पुत्र येशू मरणातून जिवंत झाल्याच्या पन्नास दिवसांनंतर, त्याच्या अनुयायांत राहण्यास पवित्र आत्मा आला. देव जो बाप, देव जो पुत्र (येशू) आणि देव जो पवित्र आत्मा एक देव कसे आहे, हे जरी शिष्यांना समजले नसले तरी देव त्यांच्याबरोबर राहायला आला म्हणून ते आनंदित होते. इतरांना येशू विषयी सांगण्यास प्रेषितांना मदत व्हावी म्हणून देवाने अद्भुत गोष्टी केल्या.



जे लोक येशूवर विश्वास ठेवत त्यांच्याजवळ
जे काही असे ते सर्व समाईक असे, याप्रकारे
त्यांच्यातील गरिबांची काळजी घेतली जात
होती. परंतू हनन्या आणि सप्पीरा नावाचे
एक जोडपे होते ते प्रामाणिक नव्हते.
त्यांनी काही जमिन विकली आणि
विक्रीचा सर्व पैसा प्रेषितांच्या
चरणाजवळ आणला
असे भासविले. त्यांनी
गुप्तपणे काही भाग
त्यांच्यासाठी मागे
ठेवून घेतला होता.



पेत्राने हनन्याला विचारले, "तूं पवित्र आत्म्याशी लबाडी करावी म्हणून सैतानाने तुझे मन का भरविले? तूं मनुष्याशीं नव्हे तर देवाशी लबाडी केली आहेस." मग हनन्याने खाली पडून प्राण सोडला आणि तरुणांनी उठून त्याला गुंडाळलें व बाहेर नेऊन पुरले.



थोड्याच वेळात, सप्पीरा आंत आली, तेंव्हा तिचा पती मरण पावला आहे हे तिला माहित नव्हते. पैशांविषयी ती देखिल खोटे बोलली आणि तिच्याशी देखिल तसेच घडले. हे ऐकणाऱ्या सर्वांना मोठे भय वाटले.



प्रेषितांच्या व्द्ारे देव जो
पवित्र आत्मा याने पुष्कळ
चिन्हे आणि अद्भुते
केली. उदाहरणार्थ,
पेत्राची सावली अंगावर
पडल्यामुळे आजारी
लोक बरे झाले.



देवाची उपस्थिती दाखवणाऱ्या, महान चमत्काराची ती वेळ होती. अधिकाधिक लोकांनी येशूवर विश्वास केला. यामुळे मुख्य याजकाला जास्तच राग आला. त्याने प्रेषितांना धरून तुरुंगात टाकले !





परंतू रात्रीच्या वेळी देवाच्या एका दुताने तुरुंगाची दारे उघडून त्यांना बाहेर आणले, आणि म्हटले, "जा आणि मंदिरांत उभे राहून ह्या जीवनाचा सर्व संदेश लोकांना सांगा." प्रेषित बाहेर जाऊन येशूविषयी संदेश सांगू लागले. सकाळी मुख्य याजकाच्या लोकांना तुरुंगात कोणी सापडले नाही.

अखेरिस जेंव्हा ते त्यांना सापडले तेंव्हा मुख्य याजकाने प्रेषितांना दटावले. तो म्हणाला, "ह्या नावाने शिक्षण देऊ नका असे आम्ही तुम्हांला निक्षून सांगितले होते की नाही?" पेत्र व इतर प्रेषितांनी उत्तर दिले, "आम्ही मनुष्यापेक्षा देवाची आज्ञा मानली पाहिजे." हे ऐकून मुख्य याजक फारच चिडून गेला आणि प्रेषितांना जिवे मारण्याचा विचार करु लागला. त्याऐवजी त्यांना मार देऊन सोडून देण्याचा आदेश दिला.



त्यांना वेदना होत असतांनाहि,
प्रेषितांनी देवाचे ऐकले आणि येशूचा
संदेश सांगण्याचे काम केले.



एके दिवशी स्तेफन नावाच्या एका माणसाला अटक करण्यात आली. स्तेफन प्रभू येशूवर प्रीति करित होता. इतरांना प्रभू येशू विषयी सांगण्यासाठी पवित्र आत्मा त्याचा उपयोग करित होता. स्तेफन देवाविरुध्द् भाषण करतो असे म्हणत काही लोकांनी त्याच्यावर खोटे आरोप लावले.

दिखावा करणारी न्यायालयीन चौकशी झाल्यावर, येशूवर विश्वास असल्यामुळे स्तेफनाला दगडमार करुन जिवे मारण्यात आले.



तो मरण पावण्याच्या आधि,
स्तेफनाने पवित्र आत्म्याने
परिपूर्ण होऊन आकाशाकडे
निरखून पाहिले तेंव्हा
देवाचे तेज व देवाच्या
उजवीकडे येशू उभा
असलेला त्याच्या
दृष्टिस पडला.



लोकसमुदाय त्याला दगडमार
करीत असता तो म्हणाला, "हे
प्रभू येशू, माझ्या आत्म्याचा
स्विकार कर." आणि मग
वधस्तंभावरिल येशू
प्रमाणे, या बहादुर
पुरुषाने त्याचा
वध करणाऱ्यांची
देवाने क्षमा
करावी अशी
प्रार्थना केली.



स्तेफनच्या मृत्यूने छळाची एक नविन लाट उसळली. स्तेफनचा वध करण्यात हात असलेला शौल नावाचा एक तरुण होता, त्याला जे ख्रिस्ती विश्वासणारे सापडतील त्यांना तो अटक करित सुटला होता. पुष्कळांना त्यांचे घरे सोडून पळून जावे लागले व त्यांची यहुदीया व शमरोनात पांगापांग झाली.



जरी त्यांचे शत्रू त्यांना जिवे मारु पाहात होते तरी जिकडे जिकडे ते गेले तिकडे तिकडे त्यांनी येशूची सुवार्ता सांगितली. येशूच्या अनुयायांना कोणीही थांबवू शकत नव्हते, कारण देवाचा पवित्र आत्मा त्यांच्यामध्ये राहात होता आणि त्यांच्याव्द्ारे कार्य करित होता.



मंडळी समस्यांना तोंड देते

परमेश्वराची वाणी - बाइबल मधून गोष्ट

घेण्यात आली आहे

प्रेषित ५-७

"तुझ्या वचनांच्या उलगड्याने प्रकाश प्राप्त होतो."
स्तोत्रसंहिता ११९:१३०

समाप्त

बाइबलमधील ही गोष्ट आम्हांला आमच्या सुंदर परमेश्वराविषयी सांगते ज्याने आम्हांला बनविले आणि ज्याची अशी इच्छा आहे की आम्ही त्याला ओळखावे.

परमेश्वराला माहित आहे की आम्ही वाईट गोष्टी केल्या आहेत, ज्याला तो पाप म्हणतो. पापाची शिक्षा मरण आहे, पण परमेश्वर तुमच्यावर इतके प्रेम करतो की त्याला तुमच्या पापांची शिक्षा मिळावी आणि वधस्तंभावर मरावे म्हणून त्याच्या एकुलता एक पुत्र येशू याला पाठविले. नंतर येशू जिवंत झाला आणि स्वर्गातील घरी गेला. जर तुम्ही येशूमध्ये विश्वास ठेवता आणि तुमच्या पापांसाठी त्याने क्षमा करावी अशी त्याला विनंती करता, तर तो नक्की क्षमा करील. तो आता तुमच्याबरोबर येऊन राहील आणि तुम्ही त्याच्याबरोबर कायम राहणार.

हे सत्य आहे यावर जर तुम्ही विश्वास ठेवता, तर परमेश्वराला हे सांगा:
प्रिय येशू, तू परमेश्वर आहेस आणि माझ्या पापांसाठी मरण पावण्यास मनुष्य बनला आणि आता तू जिवंत आहे यावर माझा विश्वास आहे. कृपा करून माझ्या जीवनात ये आणि माझ्या पापांची मला क्षमा कर, जेणेकरून आता मला नवीन जीवन प्राप्त होईल, आणि एके दिवस मी कायम तुझ्याबरोबर राहण्यासाठी येईन. तुझी आज्ञा पाळण्यासाठी आणि तुझे मूल होऊन जगण्यासाठी मला मदत कर. आमेन.

बाइबल वाचा आणि परमेश्वराशी रोज बोला!    योहान 3:16